International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Vol. 1 No.1
Sept – Oct 2013

GEOGRAPHY

# खिद्रापूर एक दुर्लक्षीत पर्यटन स्थळ: एक चिकित्सक अभ्यास

प्रा. दादासाहेब आप्पासाहेब सरदेसाई
*सहाय्यक प्राध्यापक,*
*सदाशिवराव मंडलिक, महाविद्यालय, मुरगूड*

## गोशवारा

*आज पर्यटन हा जगातील सर्वात मोठा आणि वेगाने विकसित होणारा व्यवसाय आहे. जगामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या ठिकाणासोबतच सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली ठिकाणे देखील पर्यटकांना आकर्षूण घेत आहेत. पर्यटन हा फक्त आर्थिक व्यवसाय नसून यामधून इतिहास, निर्सग, संस्कृती आणि परंपरा यांना एकत्रित आणून लोकांच्या जीवनात मानसिक स्वास्थ्य व आनंद देणारा व्यवसाय आहे. आजच्या आधुनिक धावपळीच्या जीवनात पर्यटनाचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच वाढत चालेले आहे.*

*खिद्रापूर हे कोल्हापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण आहे. शिरोळ तालुक्यात कृष्णा नदीच्या काठावर वास्तुशिल्प शैलीचा उत्कृष्ट नमुना असलेले व महाराष्ट्राचे खजूराहो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण म्हणजे खिद्रापूर होय. खिद्रापूर येथे अकराव्या शतकात बांधलेले व उत्कृष्ट शिल्पशैली लाभलेले कोपेश्वराचे द्रविड शैलीचे मंदिर आहे. परंतु पर्यटन विकासाच्या दृष्टीने विचार करता हे दुर्लक्षीत राहिले आहे.*

*प्रस्तुत शोध निबंधात खिद्रापूर हे पर्यटन विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षीत का राहिले. या ठिकाणाच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने कसा विकास करता येईल व येथे पर्यटन विकासाकरीता संभाव्य कोणत्या गोष्टी उपलब्ध आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

## प्रस्तावना :

आज पर्यटन हा जगातील सर्वात मोठा आणि वेगाने विकसित होणारा व्यवसाय असून स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार निर्मितीच्या संधी या दृष्टीने त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. जगामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने नैसर्गिक सौंदर्य ठिकाणाबरोबरच सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली ठिकाणे देखील पर्यटकांना आकर्षूण घेत आहेत. पर्यटन हा फक्त आर्थिक

व्यवसाय नसून या मधून इतिहास, निसर्ग, संस्कृती आणि परंपरा यांना एकत्रित आणून लोकांच्या जीवनात मानसिक स्वास्थ व आनंद देणारा व्यवसाय आहे. आजच्या आधुनिक धावपळीच्या जीवनात पर्यटनाचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच वाढत चाललेले आहे.

खिद्रापूर हे कोल्हापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण आहे. शिरोळ तालुक्यात कृष्णा नदीच्या काठावर वास्तुशिल्प शैलीचा उत्त्कृष्ट नमुना असलेले व महराष्ट्राचे खजूराहो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण म्हणजे खिद्रापूर होय. खिद्रापूर येथे अकराव्या शतकात बांधलेले व उत्कृष्ट शिल्पशैली लाभलेले कोपेश्वराचे द्रविड शैलीचे मंदिर आहे. परंतु पर्यटन विकासाच्या दृष्टीने विचार करता हे ठिकाण पूर्णपणे दुर्लक्षीत राहिले आहे.

प्रस्तुत शोध निबंधात खिद्रापूर हे पर्यटन विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षीत का राहिले. या ठिकाणच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने कसा विकास करता येईल व येथे पर्यटन विकासाकरीता संभाव्य कोणत्या गोष्टी उपलब्ध आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## अभ्यासाचा उद्देश :

१. खिद्रापूर हे पर्यटन विकासाच्या दृष्टीने दूर्लक्षीत का राहिले आहे या मागील कारणांचा शोध घेणे.
२. खिद्रापूर या ठिकाणाचा पर्यटन विकासाच्या दृष्टीने कसा विकास करता येईल हे अभ्यासणे.
३. खिद्रापूर येथे पर्यटन विकासाच्या दृष्टीने कोणत्या संभाव्य गोष्टी उपलब्ध आहेत याचा शोध घेणे.

## अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधाची प्राथमिक स्वरूपाची माहिती प्रत्यक्ष अभ्यास क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन संकलित केली असून या माहिती बरोबर या पर्यटन क्षेत्राची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथाचा आधार घेतलेला आहे.

## अभ्यास क्षेत्र :

खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात असलेले गाव असून कोल्हापूर पासून ६०कि.मी.पूर्वेला कृष्णा नदी काठावर वसलेले आहे. खिद्रापूर पासून कोल्हापूर

व मिरज हि जवळची रेल्व स्थानके आहेत. खिद्रापूरचे अक्षवृत्तीय स्थान १६°३७' उत्तर असून रेखावृत्तीय स्थान ७४°४१' पूर्व असे आहे.

**खिद्रापूर व कोपेश्वर मंदिर परिसर :**

कृष्णा नदी महाराष्ट्रातून कर्नाटकात प्रवेश करून कुरूंदवाड जवळ ती पंचगंगेला मिळते. पुढे या नदीला दुधगंगा नदी मिळते. कोपेश्वराजवळ या नदीला चंद्राकार वळण आहे. खिद्रापूर हे गाव या वळणात सामावलेले आहे. खिद्रापूरला तिन्ही बाजूला कृष्णा नदी आहे. पावसाळयात कृष्णा नदी दुथडी भरून वाहू लागल्यावर काही काळासाठी या भागाचा जमिनीवरून असलेला संपर्क तुटतो. तसेच अष्ट तिर्थांची पुन्य भूमी म्हणून कोपेश्वर परिसर ओळखला जातो.

खिद्रापूर कोपेश्वर मंदिर परिसर निसर्गरम्य असा आहे. येथील शेत जमिनी भरघोस पिकांनी आणि वृक्षवेली फुलाफळांनी बहरलेल्या दिसून येतात. या ठिकाणी कृष्णा नदीचा प्रवाह अतिशय संथ झालेला दिसून येतो. कोपेश्वर मंदिराचा भग्नावशेष, कलावशेष म्हणजे त्या काळाच्या कला वैभवाचा जिता जागता साक्षीदार या ठिकाणी पाहावयास मिळतो.

**खिद्रापूर–कोपेश्वर मंदिराचा शिल्प अविष्कार :**

कोपेश्वर मंदिर हे स्वंयभू वास्तूशिल्प शैलीचे द्रविड संस्कृतीचा प्रभाव असणारे मंदिर आहे. दहाव्या, अकराव्या आणि बाराव्या शतकामध्ये प्रचंड आकाराची भव्यदिव्य रचनेची मंदिरे बांधली गेली. त्यामुळे खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर हे अप्रतिम वास्तुशिल्पाचा अविष्कार असलेले धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे.

खिद्रापूर येथील कोपेश्वराचे मंदिर कोणी बांधले हे निश्चित करणे अवघड आहे.. परंतु शिलाहार नृपती गंडरादित्याच्या काळात निर्मिती प्रक्रियेस प्रारंभ झाला असावा. कारण सभामंडपातील खांबाना छताशी जोडण्यासाठी जे तिरपे आधारावर शिलहार नृपती विजयदित्य यांचा सेनापती बोपण यांचे नाव कोरलेले आहे. अर्थात शिलहार नृपती गंडरादित्य (इ.स. ११०५ ते ११४०) ते विजयदित्य (इ.स. ११७५ ते १२१२) या काळात म्हणजेच ११२० ते १२०० या काळात हे बांधकाम झाले असावे आणि या मनोहरी देवालयाची निर्मिती दोन ते तीन दशके चालली असावी असे आढळून येते.

**खिद्रापूरचे शिल्प सौंदर्य :**

खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिर द्रविड शैलीचा उत्तम नमुना आहे. मंदिरातील जोते आणि भिंती यावर बाहेरील बाजूने कोरलेले गजथर, मनुष्यथर (नरथर), मंदिरातील गवाक्षे आणि वायुवीजनाच्या सोयी यांची अतिशय योजनाबध्द आणि प्रमाणबध्द अशी बांधणी केलेली आहे. मंदिराची वास्तूशिल्प रचना खास वैशिष्टयपूर्ण अशी दिसून येते. मंदिराची पूर्व पश्चिम लांबी १५२ फुट आणि रूंदी १०४ फुट अशी आहे. मंदिरामध्ये स्वर्गमंडप, सभामंडप, अंतराळकक्ष आणि गर्भगृह किंवा कोपेश्वराचा गाभारा यांची उत्कृष्ट शिल्पकला कोरलेली रचना दिसून येते.

**अप्रतिम शिल्प वैभव :**

शिल्पकलेने नटलेल्या या मंदिरात कोपेश्वराचे मंदिर वैशिष्टपूर्ण असे आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूने देवदेवता व स्त्रिपुरूषांची जी शिल्पपट्टी मंडित असते तिला नरपट्टी म्हणतात. नरपट्टीखाली या मंदिराला गजपट्टी आहे. जी इतर कोठेही पाहावयाा मिळत नाही. गजावर आरूढ देवदेवतांचा अंखडपट्टा म्हणजे गजपट्टी होय. गजपट्टीखाली नक्षीदार कठड्यांची मालिका आहे. हत्तीवर बसलेल्या देवता यांची आभुषणे, पोषाख, हातातील आयुध्ये, त्यांनी घातलेले अलंकार इत्यादीचे अत्यंत बारीक बारकावे येथे पाहावयास मिळतात.

गजपट्टीवर माणूस सहज उभा राहून वरील नरपट्ट्यांची शिल्पकला पाहू शकेल असा ओवरी वजा कठडा आहे. नरपट्यातील शिल्प सौंदर्यही चांगले आहे. इथे नर्तकिंच्या भावमुद्रा आहेत. स्त्री सौंदर्याचे सर्व बारकावे येथे पाहावयास मिळतात. मानवी शरीर शौष्टव व तत्कालीन वाद्ये, आयुध्ये यांचे सुंदर प्रदर्शन इथे आहे.

सुमारे दीड हजार वर्षापूर्वीच्या आपल्या देशातील समाज जीवनाचे व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब कोपेश्वर देवालयाच्या माध्यमातून पाहावयास मिळते. इथे गजशिल्प प्रमुख असून याबरोबरच नंदीची शिल्पे, अश्व, बोकड, वराह, मकर, मेष, महिष यांची शिल्पे आहेत. तसेच आंबा, काजू, केळी, द्राक्षघड यांची शिल्पे आहेत. कमळ, कर्दळ अशा अनेक फुलांचे प्रकार इथे आहेत. नखशिखांत आभूषणांनी नटलेल्या युवतींची शिल्पे इथे आहेत. ध्यानस्थ योग्यांच्या मूर्ती येथे पाहावयास मिळतात. म्हणजेच माणसातील सारे भावाविष्कार येथे दगडी शिल्पातून प्रकटलेले दिसून येते.

**खिद्रापूर पर्यटन स्थळ दुर्लक्षित का आहे :**

१. खिद्रापूर हे राष्ट्रीय व राज्य महामार्गापासून खुपच दूर अंतरावर असल्याने पूरेशी प्रवासी वाहतूक साधने उपलब्ध नाहीत. त्यामूळे पर्यटकांना या ठिकाणी सहजासहजी पोहचता येत नाही. खिद्रापूरला जाणारे रस्ते खूपच खराब व लहान आहेत. तसेच कोल्हापूर व सांगली या मोठ्या शहरापासून बसची सुविधाही फारशा नाहीत.

२. हे ठिकाण कृष्णा नदीकाठावर व पंचगंगा आणि दुधगंगेच्या पंचक्रोशीत वसले असल्याने पावसाळ्यात या ठिकाणी महापूर येतो. या काळात या ठिकाणचा संपर्क तुटतो.

३. या ठिकाणी पर्यटकांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. उदा. लॉजिंग, बोर्डींग, हॉटेल्स इ.

४. या ठिकाणाच्या विकासासाठी या मंदिरातून कोणत्याही प्रकारचे आर्थिक उत्पन्न उपलब्ध नसून याबाबत शासनाचेही दुर्लक्ष आहे. या आर्थिक अडचणीमुळे येथे सोयी सुविधा व विकास झालेला नाही.

५. मंदिरासमोर नदीचा घाट आहे. परंतु तो पूर्णपणे गाळाने भरलेला आहे. घाटाची दुरूस्ती झालेली नाही. तसेच आजूबाजूचा परिसरही अस्वच्छ आहे.

६. कोपेश्वर मंदिर परिसराच्या आजूबाजूस गावातील लोकांची घरे आहेत. त्यामुळे मंदिर विकासासाठी अपुरी जागा असल्याने मंदिराच्या परिसरात कोणतेही विकास कामे झालेली नाहीत.

७. मंदिराच्या समोरच्या परिसरात कृष्णा नदीतून वाळू उपसा मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे हा परिसर ट्रक, ट्रॅक्टर यांनी पूर्ण भरलेला दिसतो.

८. या मंदिरातील शिल्प अविष्कार अप्रतिम असूनही त्यांची फारशी प्रसिध्दी झालेली नसल्याने हे ठिकाण बऱ्याच लोकांना अपरिचीत आहे. त्यामुळे पर्यटक फारसे येत नाहीत. फक्त स्थानिक लोकच देवदर्शनाच्या निमित्ताने भेट देतात.

**खिद्रापूर परिसर पर्यटन विकासासाठी उपाय योजना :**

१. खिद्रापूर परिसरातील शिल्प व निसर्ग वैभवाची माहिती देश व जागतिक पातळीवर दिल्यास अनेक देशी विदेशी पर्यटक या ठिकाणी आकर्षित होतील व त्यातून पर्यटन विकासाला चालना मिळेल.

२. कोल्हापूर व सांगली या जिल्ह्याच्या ठिकाणाहून विशेष बस सुविधा सुरू करणे आवश्यक आहे. याबरोबरच रस्ते विकासाअंतर्गत हे पर्यटन स्थळ राज्य व राष्ट्रीय

महामार्ग आणि मिरज रेल्वे जंक्शन यांना जोडल्यास प्रवासी वाहतूक साधनांचा विकास होवून पर्यटन विकासास हातभार लागेल.

३. राष्ट्रीय पातळीवरील खिद्रापूर–बदामी–विजापूर हा पर्यटकांचा 'सुवर्ण त्रिकोण' (गोल्डन टुरिस्ट ट्रॅंगल ) निर्माण करण्याची योजना कार्यान्वित होणे गरजेचे आहे. यामुळे खिद्रापूर, बदामी, विजापूर, हंपी, हॉस्पेट, कुडलसंगम ही ठिकाणे जोडली जाऊन कमी वेळेत कमी खर्चात जास्तीत जास्त पर्यटन स्थळे पाहता येतील.

४. खाजगी उद्योजकांच्या मदतीवर या परिसरातील खुद्द खिद्रापूर, मिरज, सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर येथे पंचतारांकीत, चतुर्थ तारांकीत आणि तृतीय तारांकीत हॉटेल्सची उभारणी करून परदेशी पर्यटकांची राहण्याची, खाण्याची व्यवस्था करून त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर परदेशी चलन महाराष्ट्र शासनास मिळविता येईल.

५. औरंगाबाद वरून रेल्वेने गोव्याकडे जाणारा परदेशी पर्यटकांचा स्त्रोत जर मिरजेपासून केवळ तीस मैलावर असलेल्या खिद्रापूरकडे वळविला तर मोठा विकास होईल.

६. पॅकेज टुर्स योजने अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळाबरोबरच खिद्रापूरचाही समावेश करावा.

७. खिद्रापूर कोपेश्वर मंदिरा समोरीली कृष्णा नदीत बोटींगची व्यवस्था केल्यास पर्यटकांना बोटींगचा आनंद घेता येईल व यातून शासनाला आर्थिक उत्पन्न मिळेल.

८. या ठिकाणाला भेट देणाऱ्या स्थानिक, देशी व विदेशी पर्यटकांकडून कर रूपात पैसा उपलब्ध केलेस मंदिर परिसर विकासास हातभार लागेल.

९. मंदीरासमोरील घाट परिसर विकसित करून त्या ठिकाणी स्वच्छता राखल्यास व गार्डन विकसीत केल्यास पर्यटक आकर्षित होऊ शकतील.

**संदर्भ ग्रंथ :**

१. महाराष्ट्राचे खजूराहो खिद्रापूर– टी.ल.कळसेकर, काळशेखर प्रकाशन पुणे.
२. खिद्रापूरची मंदिरे भारतीयांची प्राचीन ठेव– डॉ. रामचंद्र गोविंद चोथे.
३. खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर – अलका भरत कुलकर्णी.
४. कोपेश्वर मंदिराची माहिती – गजानन हुद्दार.
५. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर – कोल्हापूर जिल्हा.